सकाळ

‘लक्ष्य’भेद



सोनल सोनकवडे

# निर्णयक्षमता

अनेकदा लोक आपण एखादा प्रश्न विचारल्यास उत्तर देताना गोंधळून जातात. प्रश्न त्यांना थोडासा अनपेक्षित असेल, तर नक्की त्याचं काय आणि कसं उत्तर द्यावं, हे त्यांना सहसा लक्षात येत नाही. लहान असताना आपल्या सगळ्यांनाच घरी येणारे कुणी पाहुणे, कधी नातेवाईक यांच्यापैकी एकंने तरी हा प्रश्न विचारलेलाच असतो की, तू मोठा/मोठी होऊन काय होणार किंवा पुढं जाऊन काय करायचं ठरवलं आहे? तसं पाहिलं तर असा प्रश्न आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळ्या स्वरूपात आपल्याला विचारला जातो. याचं उत्तर अनेक जण ‘अजून काही ठरलं नाही’ किंवा मग ‘बघू ,जसं जमेल तसं करू काहीतरी’ असं देतात. काहीजण आपल्याला नेमकं काय करायचं आहे हे अनेक पर्यायांमधून निवडत असतात, त्यांच्यासमोर पर्याय असतील तर निवड सोपी जाते. काही जण आपल्याला काय करायचं आहे यावर ठाम असतात. ठाम उत्तर देण्यामागं महत्त्वाचं कारण असतं, ते म्हणजे विचारांची स्पष्टता. स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीनं ती कशी आत्मसात करता येऊ शकते आणि महत्त्वाची असते हे आपण जाणून घेऊयात.

## वैचारिक स्पष्टता

काही वेळा आपल्या आजूबाजूच्या वातावरणातून, कुटुंबातील लोकांच्या वागण्या-बोलण्यावरून वैचारिक स्पष्टता आपल्या अंगात रुजत जाते. जे माझ्याबाबत झालं. एखादा निर्णय घेताना आपल्या आई-बाबांचा किंवा इतर कुणाचा गोंधळ उडताना आपण बघितला असल्यास निर्णय घेण्याबद्दल चिंता किंवा भीती आपल्या मनात साठून राहते. साध्या साध्या गोष्टी ठरवतानाही आपल्याला बराच वेळ विचार करावा लागतो. मित्र-मैत्रिणी किंवा आई-वडील, नातेवाईक यांच्याबरोबर बाहेर हॉटेलात गेलो असता आपल्यापैकी काही जणांना मेनू कार्ड बघूनही आपण आत्ता नक्की काय खावं, हे ठरवता येत नाही. अनेक पर्यायांमुळं आपला गोंधळ उडतो. हा गोंधळ आपल्या आयुष्याशी संबंधित अनेक बाबतीत निर्णय घेताना उडालेला असतो. आपण काही वेळा संभ्रम झाला आहे, असं म्हणून ती गोष्ट सोडून देतो.

एकापेक्षा अधिक पर्याय आपल्यासमोर आले की उडणारा गोंधळ आपल्या सर्वांनाच सवयीचा आहे. हे करू की ते करू, हे खाऊ की ते खाऊ, आज कुठला ड्रेस घालू, फिरायला कुठं जायचं; कुठला सिनेमा/वेब सिरीज पाहू अशा अनेक पर्यायांमधून आपण एक गोष्ट करायची ठरवत असतो. काही लोकांना हे प्रश्न पडत नाहीत. अमुक एक हॉटेलमध्ये गेलो तर काय खायचं; आज कुठला ड्रेस घालायचा; कुठला सिनेमा बघायचा; कुठं फिरायला जायचं असं सगळं त्यांचं निश्चितच ठरलेलं असतं. असं इतक्या पटापट या लोकांना ठरवता कसं येतं, हा प्रश्न त्यांच्या सोबत असलेल्या लोकांना पडलेला असतो. आपल्यालाही अजिबात वेळ न काढता झटपट निर्णय झाला तर त्याचं अप्रूप वाटतं. अर्थात, निर्णय प्रक्रियेमध्येसुद्धा वैयक्तिक आणि सार्वजनिक निर्णय असे दोन प्रकार आहेत. वैयक्तिक निर्णय असल्यास त्या व्यक्तीला आणि सार्वजनिक असल्यास त्या अधिकाऱ्याला किंवा नेत्याला ती वैचारिक स्पष्टता असणं खूप महत्त्वाचं असतं. एखाद्या गोष्टीला असलेले अनेक पदर अशा व्यक्तीच्या लक्षात येणं महत्त्वाचं असतं. शासकीय अधिकाऱ्यालाही लोकांसाठी एखाद्या प्रकल्पासंबंधीचा निर्णय घ्यायचा असल्यास अनेक घटकांचा विचार करावा लागतो.

**(लेखिका ‘आयआरएस’ अधिकारी, गायिका, गीतकार आहेत.)**

